ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 9 | MAY - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# यादव कालीन सोलापूर जिल्ह्यातील व्यापार (वाणिज्य) एक दृष्टीक्षेप



मानव किसन कांबळे[१] , प्रा. डॉ रविकिरण जाधव[2]
[१]पीएच.डी. संशोधक विद्यार्थी , प्रा.भा.इति.संस्कृती व पुरातत्त्व
डी.बी.एफ दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर.
[२]दयानंद महाविद्यालय, सोलापुर.

## प्रस्तावना :

यादव कालीन महाराष्ट्रात गोदावरी, कृष्णा, पूर्णा, भीमा, मांजरा, सीना, वैनगंगा, प्राणहिता इत्यादी नद्यांच्या पाण्यामुळे व या नद्यांच्या खोऱ्यात पूर्णपणे स्थिरावलेला शेती व्यवसाय व त्यास पूरक असे व्यवसाय मोठ्या प्रमाणात स्थिर झाले होते. वरील नदीच्या खोऱ्यापैकी गोदावरी खोरे हे दक्षिण भारतातील तत्कालीन सर्वांत समृध्द व विस्तृत खोरे मानले जाई. त्यामुळे यादव कालीन वाणिज्य व व्यापार मोठ्या प्रमाणात विकसीत झाला. गोदावरी, कृष्णा, भिमा या पूर्ववाहिनी नद्यांना पश्चिमेकडून पश्चिम घाट (सह्याद्री) पर्वतरांगाची नैसर्गिक सुरक्षितता लाभल्याने यादवांच्या राज्यातील पैठण, नाशिक, कोल्हापूर, नगर, पंढरपूर आदी शहरे व्यापारासाठी ओळखू जावू लागली. तसेच तत्कालीन शासकांनी व्यापाराच्या विकासासाठी विविध प्रयत्न केल्याचे दिसते. त्यासाठी त्यांनी एक स्वतंत्र यंत्रणा राबविण्यात आली होती. विविध सुविधा उपलब्ध करुन दिल्या. येणाऱ्या अडचणीचे निराकरण केले व शिस्तबध्द पध्दतीने विकसीत केल्या.

यादव काळात भागवत संप्रदायाचा उगम होऊन पंढरपूरच्या विठ्ठलाचे दर्शन घेणे व आषाढी/कार्तिकी एकादशी निमित्त वारी सुरु झाली होती. देवगिरी (औरंगाबाद) अर्थात मराठवाड्यामधून पंढरपूरास येण्यासाठी जो राजमार्ग होता. देवगिरी - परांडा - पंढरपूर या मार्गावर विविध बाजारपेठांची निर्मिती होऊन त्या विकसीत झाल्या. करकंब ही बाजारपेठ यादव काळातील एक महत्त्वाची बाजार पेठ म्हणून ओळखली जात होती.

## उद्देश :

१) यादव कालीन महाराष्ट्राचे दक्षिण व उत्तर भारतामधील महत्त्व/दुवा
२) यादव काळातील व्यापारी केंद्र म्हणून उदयास आलेली शहरे
३) बाजारपेठावर यादव प्रशासनाचे व्यवस्थापन
४) यादव राजांनी उपलब्ध केलेल्या विविध सुविधा
५) यादव काळातील व्यापारी व उद्योग क्षेत्रात सोलापूरचे (जिल्हा) स्थान यांचा आढावा घेऊन त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधात केला आहे.

## पार्श्वभुमी :

यादव काळाच्या अगोदर पासून महाराष्ट्रात व्यापार होत होता. कौटीलीय अर्थशास्त्राच्या मते भारतातील प्राचीन व्यापार हा उत्तर भारतापेक्षा दक्षिण भारतात मोठ्या प्रमाणावर होत होता. दक्षिण भारतामध्ये रेश्मी कापड, मौल्यवान खनिजे, मसाल्याचे विविध पदार्थ, हस्तीदंत यांची उपलब्धता येथील भौगोलिक रचनेमुळे विपुल प्रमाणात होती. दक्षिण भारतातील प्रमुख व्यापारी/ बाजारपेठा यापासून दोन्ही किनाराच्याकडे (पूर्व घाट-पश्चिम घाट) व्यापारासाठी उपयुक्त अशी अनेक बंदरे होती. त्यामुळे येथील वस्तु दक्षिणेमधून उत्तर भारतात पाठविणे. परदेशामध्ये निर्यात करणे, विदेशी वस्तु आणणे या खुप सहज शक्य होत्या. त्यामुळे महाराष्ट्र व येथील व्यापार केंद्र यादव काळात त्या अगोदरपासून व्यापाराचे प्रमुख केंद्रस्थान बनले होते.

**बाजारपेठ व्यवस्था :**

वर नमूद केल्याप्रमाणे यादव काळातील एक महत्त्वाची बाजारपेठ म्हणून करकंब ला स्थान प्राप्त झाले होते. १२ व्या, १३ व्या शतकापासून संपूर्ण तत्कालीन महाराष्ट्रातून संत लोक पायी वारी करण्यासाठी किंवा पंढरपूरच्या दर्शनासाठी जात असताना त्यांना लागणाऱ्या विविध जीवन उपयोगी वस्तुची खरेदी-विक्री करण्यासाठी ही बाजारपेठ अत्यंत महत्त्वाची होती.

पंढरपूर तालुक्यातील करकंब या गावाचा इतिहास इ. स. ५ व्या शतकापासून उपलब्ध आहे. पंढरपूर येथील आढळलेल्या एका इ.स. १२७२ च्या शिलालेखात करकंब या गावाचा उल्लेख 'किरीकोम' असा आहे. त्यामध्ये विविध धार्मिक कार्यासाठी देण्यात आलेल्या देणगीदारांची नांवे आहेत. मुख्यत: ही देणगी मंदीर बांधकामासाठी देण्यात आली होती. हे वाफळे ता. मोहोळ येथील एका शिव मंदिराच्या शिलालेखावरुन स्पष्ट होते. या शिलालेखामध्ये करकंबचा उल्लेख हा 'करकंब देश' असा करण्यात आला आहे.

या शिलालेखाचा काळ याची तुलना करुन त्यावेळी देवगिरीचे यादव या कुळातील भिल्लम (श्रवणपती) सिंघण II याने व त्याचा पुत्र जैत्रपाल याने करकंबच्या बाजारपेठ व्यवस्थेसाठी योगदान दिल्याचे स्पष्ट होते. त्याकाळी दळण-वळणाची साधने उपलब्ध नव्हती. मालाची व लोकांची वाहतुक करण्यासाठी बैलगाड्यांचा वापर करण्यात येत होता. देवगिरीचा यादव उर्फ भिल्लम (श्रवणपती) सिंघण दुसरा याने व त्याचा पुत्र जैत्रपाल याने 'विश्वनाथ' नावाच्या सिंघण यादवाच्या सामंताला 'करकंब' या व्यापार केंद्राचा प्रमुख म्हणून नेमले होते. तसेच बाजारपेठेच्या संपूर्ण व्यवस्थेसाठी 'भाईदेव' हा यादवांचा प्रधान नेमण्यात आला होता. तो दिनुनायक याचा अधिकारी होता. असा उल्लेख वाफळे ता. मोहोळ येथील शिलालेखावरुन स्पष्ट होते.[१] वा.कृ. भावे, महाराष्ट्रातील सामाजिक इतिहास, मुसलमानपूर्व महाराष्ट्र, खंड-१, वरदा प्रकाशन, १९९८ पृ.क्र. ९४-९६, (दुसरी आवृत्ती)

**मुख्य व्यवसाय :**

प्राचीन काळापासून यादव काळापर्यंतही शेती हा येथील प्रमुख व्यवसाय असल्याने तत्कालीन संपूर्ण आर्थिक व्यवस्था, उद्योग व्यापार हा शेती व्यवसायाशी निगडीत होता. मशागत करुन उपलब्ध साधनाच्या साहाय्याने मशागत करुन जास्त उत्पादन घेण्याचे तंत्र या काळातील शेतकऱ्यांना अवगत होते. विहीरीच्या साहाय्याने सिंचन/जलपुरवठा करण्याचे तंत्रही यांना माहीत होते. ज्ञानेश्वरांच्या भावार्थदिपीका या ग्रंथातून राहटगाड्याचा उपयोग सिंचनासाठी केल्याचे दाखले मिळतात. डेक्कन कॉलेजच्या मदतीने मुडवी या ठिकाणी करण्यात आलेल्या उत्खननात विविध प्रकारची धान्याचे नमुने उपलब्ध झाले आहेत. पर्जन्यमान कमी असल्याने पाणी साठवून त्याव्दारे सिंचन करण्याची सोय करण्यात आली होती. त्याकाळातील बाजारपेठेत ज्वारी हे प्रमुख पीक व सोबत गहू, भुईमूग इ. पीके विक्रीसाठी येत असत. बाजारपेठामधून हाल (छोटा लाकडी नांगर) व नांगल (मोठा लोखंडी नांगर) विक्रीसाठी प्रामुख्याने येत असत.

**दळण-वळण :**

भारताच्या भौगोलिक स्थितीच्या रचनेनुसार यादवांचे राज्य हे भारताच्या मध्यवर्ती भागात होते. त्यामुळे दक्षिणपथ व उत्तरेकडील वस्तुची देवाण-घेवाण ही यादवांच्या राज्यातुनच होत असे. कारण रामायण-महाभारत काळापासून हा भाग प्राचीन दंडकारण्यचा भाग म्हणून ओळखला जात असे. दळण-वळणाच्या सुगमतेमुळे तत्कालीन मध्य भारतामध्ये महत्त्वाची व्यापारी केंद्र उदयास आली. त्यामध्ये पैठण, नगर, जुन्नर, नाशिक, भोगवर्धन, कोल्हापूर, पंढरपूर, करकंब, परांडा ही होत. ही व्यापारी केंद्र परस्परांशी व्यापारी मार्गाने जोडली होती. त्यापैकी 'पैठण' हे महत्त्वाचे व्यापारी शहर तत्कालीन भारतातील सर्व प्रमुख व्यापारी केंद्राशी वाहतुक मार्गाने जोडले होते. त्यामुळे व्यापाराच्या दृष्टीने महाराष्ट्रातील यादव हे राज्य अतिशय महत्त्वाचे केंद्र बनले होते.

**परराष्ट्र व्यापार :**

दळण वळणाच्या सुलभतेमुळे व दक्षिण भारतातील व्यापारी केंद्रापासून पश्चिम किनाऱ्यावर व पूर्व किनाऱ्यावर अनेक महत्त्वाची बंदरे होती. त्याव्दारे पश्चिमेकडील ग्रीस, पर्शिया, रोम इत्यादी देशाशी मोठ्या प्रमाणावर व्यापार होत होता. रोममध्ये तर भारतातून आणलेल्या वस्तु वापरणे म्हणजे प्रतिष्ठेचे मानले जात असे. स्ट्रॅबो या इतिहासकाराने तर युरोपात (तत्कालीन) जेवण करताना भारतीय मसाला वापरणे हे तेथील महिला भूषण समजत होत्या, असे नमूद केले आहे. यावरुन दक्षिण भारतातून जाणारा व दक्षिण भारतात मोठ्या प्रमाणात उत्पादन घेण्यात येणारे विविध मसाले निर्यात करण्यात येत होते. याशिवाय विविध प्रकारचे मणी, नाणी, विविध प्रकारच्या मुर्ती यांचे आदान-प्रदान होत असे, हे उपलब्ध उत्खलीत साधनाच्या पुराव्यावरुन स्पष्ट होते.

**कर आकारणी/प्रशासकीय नियंत्रण :**

यादव कालीन प्रशासनाच्या माध्यमातून बाजारपेठेवर नियंत्रण ठेवण्यात येत असे, त्यासाठी काही समिती स्थापन करण्यात आल्या होत्या. विश्वनाथ सामंताने व त्याच्या वंशाने (पुढील) करकंब बाजारपेठेत पिण्याच्या पाण्यासाठी २ विहीरी (बारव) बांधल्या होत्या. व्यापारी, सामान्य नागरीक, वारकरी यांच्या पिण्याच्या पाण्याची सोय केली होती.

(अ) वाणिज्य समिती : बाजारपेठेत होणाऱ्या विविध कामकाजावर/घडामोडीवर या समितीचे लक्ष असे. बाजारपेठेत येणाऱ्या वस्तु, विकल्या जाणाऱ्या वस्तू, वजन, मापे यावर त्यांचे नियंत्रण असे. ही समिती यादव राजे व बाजारपेठेतील व्यापारी यामधील दुवा म्हणून काम करत असत. व्यापार करणाऱ्यांना व सामान्य नागरिकांना त्यांचा विविध गरजा, पायाभुत सुविधा पुरवण्याचे काम ही समिती करत असे.

(ब) कर समिती : बाजारपेठेत विक्री होणाऱ्या विविध वस्तुवर कर किती असावा, तो कसा वसुल करावा, भेसळ करणाऱ्यवर लक्ष ठेवणे त्या गोष्टी टाळण्यासाठी प्रयत्न करणे. बाजारपेठेतील व्यापारी व उद्योग क्षेत्रातील गुन्ह्याबद्दल दंड करणे, त्याची नियमावली बनविणे इत्यादी कामे या समितीकडून केली जात असे.

यादव काळातील प्रशासन यंत्रणेवर व व्यापार पध्दतीवर प्रकाश टाकणारा संपूर्ण कर प्रणाली, माप, वजन इत्यादी गोष्टीवर प्रकाश टाकणारा एक शिलालेख खाणदेशातील पाटण येथे सापडला आहे. त्याचा काळ इ.स. ११२८ हा निश्चित करण्यात आला आहे. जरी शिलालेख पाटणचा असला तरी संपूर्ण यादव कालीन प्रशासन यंत्रणेच्या कार्यपध्दतीवर प्रकाश टाकणारा आहे. त्याचे मराठी सुलभ भाषांतर पुढीलप्रमाणे :

ह्या पाटण शहरात जो माल बाजारात विकावयास येतो. त्याच्यावरील 'असि' नावाचा जो कर राजवाड्यात अग्रस्थानी ग्राहकनामक कामदारापाशी जगत होता. तो मठाला दिला आहे. ब्राह्मणांना माल विकणाऱ्या दुकानदाराकडून जो दक्षिणा मिळेल ती ब्राह्मणांनी मठाला दिली. 'मगर' आडनावाच्या घोडेस्वाराकडे दामाचा जो विसावा हिस्सा दिला होता. तो त्याने मठाच्या ग्राहकनामे अधिकाऱ्याकडे दिला. मठाला पाणी पुरवणाऱ्या त्यसा बैलास ग्राहकनामक अधिकाऱ्याने तयार ठेवावे. 'गिधव' नावाच्या घोडेस्वाराने शहराबाहेरील मालावरच्या कराच्या पैशाचा विसावा हिस्सा ग्राहकनायक अधिकाऱ्याकडे मठाच्या उपयोगार्थ दिला. जितके घाणे चालतात. तितक्याकडून एक-एक पळी (चार तोळे) तेल मठाला दिले. ह्या मठात जे तेल मोजावयाचे आहे ते मठाच्या मापाने मोजावे. तेल जे द्ययावयाचे ते अर्धे मठाला, अर्धे मापाऱ्याला द्यावे. तूपावरील सूंक नावाचा कर (मठाला दिला) त्याचप्रमाणे खालील चतु:सीमेतील जमीन ओढूगाव, पश्चिमेस वाल्याची जमीन (कामतुड) मध्ये वडाचा बुंधा, पुकलाचा बुंधा, पंडीताची जमीन (कामतुड) चीतेग्रामी एक चाहुर, धामोजी डोंगराच्या सोंडी.[२] वा.कृ. भावे, महाराष्ट्रातील सामाजिक इतिहास, मुसलमानपूर्व महाराष्ट्र, खंड-२, वरदा प्रकाशन, १९९८ पृ.क्र. २३२, (दुसरी आवृत्ती).

या शिलालेखाच्या आधारे यादव कालीन व्यापार पध्दती, कर पध्दती, माप घेण्याची पध्दती इ. गोष्टी स्पष्ट होण्यास मदत मिळते.

यादव राजांनी सामाजिक व धार्मिक कार्यात अनेक लोकोपयोगी कामे केलेली आहेत. याचा आपणास अनुभव येईल. (स्पष्ट होईल) रामचंद्रदेव यादव याच्या कारकिर्दीत शक १२२२ मधील वेळापूर (जि. सोलापूर) या गावाच्या दक्षिणेस एका खडबडीत दगडावर लेख कोरलेला आहे. त्यात रामचंद्रदेवाचा सर्वाधिकारी (माण देश) श्री. जोइ देव, त्याच्या हाताखालचा ब्रह्मदेव राणा व त्याचा भाऊ बाइदेव यांचे उल्लेख असून शिवाय बाईदेवाने वटेश्वर देवाला मठ करुन ओवरी दिल्याचे लिहीले आहे. लेखाचा पहिला भाग संस्कृत व पुढचा भाग मराठी आहे.[३] कित्ता वा.कृ. भावे, महाराष्ट्रातील सामाजिक इतिहास, मुसलमानपूर्व महाराष्ट्र, खंड-२, वरदा प्रकाशन, १९९८ पृ.क्र. २३३, (दुसरी आवृत्ती).

वरील दोन मोडी भाषेतील यादव कालीन शिलालेखामुळे यादव काळात व्यापारी वर्गात प्रशासनाकडून कशा प्रकारे नियंत्रण ठेवले जाई, याची माहिती मिळते. तेल देण्यास-घेण्यास एक प्रकारचा माप (मठातर्फे) ठेवण्यात येत असे, हे स्पष्ट होते. शिवाय लोकांना, व्यापाऱ्यांना मठाच्या माध्यमातून आश्रम (निवास व्यवस्था) तेथे पिण्याच्या पाण्याची सोय प्रशासनाकडून करण्यात येत होती, हे स्पष्ट होते.

## निष्कर्ष :

१) साधारणपणे यादव काळात राजकीय पाठबळाच्या आधारे उद्योग-व्यापार या क्षेत्रात महाराष्ट्र (यादव साम्राज्य) हे उत्तर भारत व दक्षिण भारतामधील एक महत्त्वाचा दुवा बनले होते. हे स्पष्ट होते.
२) येथील व्यापाऱ्याच्या विस्तारीकरणामुळे अनेक महत्त्वाची व्यापारी शहरे/बाजारपेठा विकसीत झाल्या.
३) अनेक बाजारपेठामुळे त्यांना जोडणारे व्यापारी मार्ग निर्माण झाले. बाजारपेठ विकसीत झाल्यामुळे त्यावर विविध प्रशासकीय अधिकारी नेमून त्यांच्या देखभालीची सोय यादवांनी केली होती.
४) बाजारपेठांच्या ठिकाणी विहीरी, धर्मशाळा बांधून व्यापाऱ्यांची सोय करण्यावर भर देण्यात आला होता.
५) सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर, मंगळवेढा, करकंब या बाजारपेठांचा (स्थानांचा) यादव काळामध्ये उत्कर्ष झाला होता.

यावरुन करकंब व महाराष्ट्रातील विविध शिलालेखाच्या आधारे यादव काळातील आर्थिक, उद्योग व व्यापार यावर दृष्टीक्षेप टाकण्यास मदत झाली आहे. यादव राजवट ही एक आदर्श प्रशासन व्यवस्था होती, हे स्पष्ट होते.

## संदर्भ :

१) वा.कृ. भावे, महाराष्ट्रातील सामाजिक इतिहास, मुसलमानपूर्व महाराष्ट्र, खंड-१
२) वा.कृ. भावे, महाराष्ट्रातील सामाजिक इतिहास, मुसलमानपूर्व महाराष्ट्र, खंड-२
३) रोमिला थापर, आर्ली इंडिया.
४) आर.एस. मोरवंचीकर, सातवाहन कालीन महाराष्ट्र.
५) सोलापूर गॅझेटीयर.